Vol 3 Issue 5 Nov 2013

Impact Factor : 1.9508 (UIF)

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# GoldenResearch Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1.9508 (UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# ग्रामीण विकासात महिला सरपंचाची आर्थिक, समाजकल्याणकारी व राजकीय विकासात्मक भूमिका

## प्रमोदकुमार केशवजी नंदेश्वर

एम.ए. एम.फिल, नेट (राज्यशास्त्र) श्री.बी.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, रिसोड, जि. वाशिम.

***सारांश:*** प्राचीन काळापासून भारतात स्थानिक शासन संस्था ग्राम पातळीवर कार्यरत आहेत. ऐतिहासिक कालखंडात त्यांचे स्वरूप भिन्न असले तरी ही त्या ग्रामीण शासन व्यवस्थेचा अभिन्न अंग होत्या. मुस्लिम कालखंडात या संस्था काही प्रमाणात तत्कालिन शासकांनी मोडीत काढल्या असल्या तरीही त्यांचे काही अवशेष नंतरच्या मुगल व मराठा कालखंडात शिल्लक होते. ब्रिटिश सत्तेने आपल्या सुरूवातीच्या काळात हया स्वशासित, स्वावलंबी ग्रामसंस्थाचे महत्व नष्ट करून सत्तेच्या केंद्रिकरणासाठी ग्रामीण संस्था नष्ट केल्या. परंतु नंतर ब्रिटिश राजवटीने त्यांची उपयोगिता लक्षात घेऊन स्वतःच्या राजकीय गरजेतून त्यांना उपयोगी ठरतील अशा आत्मकेंद्री ग्रामसंस्था व नगर संस्थांची तत्कालिन परिस्थिती नुसार रचना करण्यास सुरूवात केली. यांच्यावर ब्रिटिशांचे नियंत्रण होते परंतु ब्रिटिश साम्राज्य व्यवस्थेपासून भारताची मुक्तता झाल्यानंतर या स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरूप बदलले. यांच्यात लोकसहभाग वाढविण्यासाठी शासनाद्वारे विशेष प्रयत्न करण्यांत आला आहे.

### *प्रस्तावना:*

भारतात स्वातंत्र्यानंतर घटकराज्य व संघ शासनाद्वारे विकासाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यांत आल्या आहेत. परंतु या योजनांची ग्रामीण भागात कोणतीच विकासात्मक परिणामकारकता दिसून येत नाही असे निदर्शनास आल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या समस्येच्या अध्ययनासाठी 1957 मध्ये बलवंतराय मेहता समितीची स्थापना केली. या समितीने सत्तेचे विकेंद्रिकरण करणारी त्रिस्तरीय योजनेची शिफारस केली. पंडित जवाहरलाल नेहरूंनी या व्यवस्थेचा ' पंचायत राज व्यवस्था ' असे नामकरण करून स्वीकार केला. महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर 1 मे 1962 पासून महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था स्वीकारण्यांत आली. 1 सन 1992 मध्ये पी.व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात 73 वे संविधान संशोधन विधेकय म्हणून सादर करून पारीत करण्यांत आले. या 73 व्या संविधान संशोधनाने पंचायत राज व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणला.

ग्रामपंचायत ही गावाच्या समृध्दिचा, विकासाचा आधार आहे. गावाच्या विकासाची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. ग्रामसुचीत अंतर्भूत शिक्षण, आरोग्य, शेती सुधार, समाजकल्याण, आर्थिक समृध्दी इत्यादी विषयाशी निगडित कार्य ग्रामपंचायतीच्या प्रमुखास म्हणजे सरपंचास करावे लागतात. यातूनच ग्रामीण विकास साधला जातो. ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासावरच ग्रामीण विकास अवलंबून आहे. सरपंच या महत्वपूर्ण पदावर विराजमान होणा—या व्यक्तिच्या कार्यकुशलतेवर, त्यांनी घेतलेल्या भूमिकेतून हा विकास साधला जातो. सरपंच पदावर महिला विराजमान झाल्यामुळे ही जबाबदारी महिला सरपंचावर आली आहे. महिलांकडे अबला, अकार्यक्षम या पुरूषी मानसिकतेतून बघितल्यामुळे महिलांना संधी व सहकार्य मिळाले तर त्या संधीचे सोने करतात हा स्त्रीवादी विचार दृष्टिक्षेपाआड होतो. महिलांना सरपंच पद प्राप्त झाल्यामुळे ग्रामीण विकासाची जबाबदारी त्यांचेकडे आली आहे. या करिता त्यांना विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. या विविधांगी भूमिका, त्या कियान्वित करतांना येणा—या अडचणीचे अध्ययन होणे गरजेचे होते. यातूनच प्रस्तुत संशोधन करण्यांत आले आहे.

***संशोधन आराखडा*** :— प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता ' वर्णनात्मक ' संशोधन आराखड्याचा (Descriptive Research) वापर करण्यांत आला आहे.

***नमुना निवड*** :— प्रसुतत अध्ययनासाठी वाशिम जिल्हयातील सहा तालुक्यातील संशोधन कालखंडात कार्यकरणा—या एकूण 560 महिला सरपंचा पैकी 50: म्हणजे 280 महिला सरपंचाची नमुना एकक म्हणून निवड केली आहे. नमुना निवडीसाठी संभाव्यता नमुना निवड ( Probability Sampling) पध्दतीतील स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दती ( Stratified Random Sampling ) चा अवलंब करण्यांत आला आहे. वाशिम जिल्हयातील सहा तालुक्यामधील महिला सरपंचाचे तालुका निहाय स्तरिकरण करून लॉटरी पध्दतीने नमुना एककाची (उत्तरदात्याची ) निवड करण्यांत आली आहे.

### *संशोधनाची उद्दिष्टये :—*

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

1.ग्रामीण विकासात महत्वपूर्ण असणा—या महिला सरपंचाच्या अर्थविषयक भूमिकेचे अध्ययन करणे.

2.ग्रामीण विकासाकरिता महिला सरपंचाच्या समाजकल्याणकारी भूमिकेचे अध्ययन करणे.

3.महिला सरपंचाच्या ग्रामविकासातील राजकीय भूमिकेचे अध्ययन करणे.

### *1. ग्रामीण विकासात महिला सरपंचाची आर्थिक भूमिका :—*

#### *ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी :—*

ग्रामपंचायतीद्वारे गावात विकासात्मक विविध कार्य केली जातात. ग्रामपंचायतीस मिळणा—या शासकिय अनुदान व उत्पन्नातून विकासात्मक कार्य करावी लागतात. या करीता ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सुदृढ असने गरजेचे आहे. ग्रामपंचायतीस दर चार वर्षानी कराचे निर्धारण करावे लागते. 2 यात सरपंचाची भूमिका महत्वपूर्ण आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी करून मिळणा—या उत्पन्नातून सरपंच विविध विकासात्मक कार्य करतात. महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी करून ग्रामपंचायतीस आर्थिक समृध्दी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे काय ? हे सारणी क्र.1 मध्ये जाणुन घेण्यांत आले आहे.

***सारणी क.1***
***ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी***

| अ.क्र. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 198 | 70.72 |
| 2 | नाही | 82 | 29.28 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणी वरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी 198 (70.72%) महिला सरपंचानी केली आहे.तर 82 ( 29.28%) महिला सरपंचानी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी केली नाही.

उपरोक्त आकडेवारीवरून असे दिसुन येते की, सर्वाधिक 70.72% महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीला मिळणा—या उत्पन्नात वृध्दी केली आहे. ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती चांगली झाल्यानंतरच विकासात्मक कार्य केले जावू शकतात. या जाणीवेतूनच बहुसंख्य महिला सरपंचांनी ग्रामीपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी केली आहे. 29.28: महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीस मिळणा—या नियमित उत्पन्नावर समाधान मानुन त्यात वृध्दी करण्याचा अतिरिक्त प्रयत्न केलेला दिसुन

येत नाही. नियमानुसार निर्धारीत वेळीच कर निर्धारण करून त्यातुन उत्पन्न प्राप्त करण्यावर या महिला सरपंचांनी समाधान व्यक्त केले आहे. यासाठी यांनी अतिरिक्त प्रयत्न केलेले दिसुन येत नाही. यावरून महिला संरपंचांनी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी करण्याची भूमिका घेतल्याचे दिसुन येते.

***ग्रामपंचायतीच्या आर्थिक समृध्दी (उत्पन्नवाढी) साठी प्रयत्न :–***

ग्रामपंचायतीच्या आर्थिक समृध्दीसाठी महिला सरपंचांनी ग्राम पंचायतीस मिळणा–या उत्पन्नात वाढ केली आहे. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नवाढीसाठी कोणत्या मार्गाचा अवलंब केला हे जाणुन घेणे महत्वाचे होते. त्याकरीता त्यांनी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नवाढीसाठी काय केले ?हा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. यातुन प्राप्त झालेली माहिती सारणी क. 2 मध्ये दर्शविण्यांत आली आहे.

***सारणी क.2***
***ग्रामपंचायतीच्या आर्थिक समृध्दी (उत्पन्नवाढी) साठी प्रयत्न***

| अ.क. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | स्थानिक करात वृध्दी | 113 | 57.07 |
| 2 | अतिरिक्त कर वृध्दी | 08 | 04.04 |
| 3 | अनावश्यक खर्चास प्रतिबंध | 77 | 38.89 |
| | एकूण | 198 | 100.00 |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी 198 महिला सरपंचानी ग्रामपंचायतीची उत्पन्नवृध्दी केली आहे. या 198 महिला सरपंचापैकी 113 (57.07%) महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीची उत्पन्न वृध्दी करण्यासाठी स्थानिक करात वृध्दी केली आहे. 8 (4. 04%) महिला सरपंचांनी अतिरिक्त कर वृध्दी केली, तर 77 ( 38.89%) महिला सरपंचांनी अनावश्यक खर्चास प्रतिबंध केला आहे.

प्रस्तुत सारणीतील आकडेवारीवरून असे दिसुन येते की, सर्वाधिक 57.07% महिला सरपंचांनी स्थानिक करात वृध्दी करून ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी केली आहे. ग्रामपंचायतीस स्थानिक कराचे निर्धारण प्रत्येक चार वर्षानंतर करावे लागते. या कराचे निर्धारण करतांना त्यात वृध्दी करून ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी करण्याची भूमिका महिला सरपंचांनी घेतली आहे. ग्रामपंचायत विविध कार्यासाठी खर्च करते. 38.89 % महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीच्या अनावश्यक खर्चास प्रतिबंध घालुन उचित बचतीच्या मार्गाने आर्थिक समृध्दी करण्याची भूमिका घेतली आहे. 4.04% महिला सरपंचांनी अतिरिक्त कर वृध्दी करून उत्पन्नात वृध्दी केली आहे. याकरीता त्यांनी मंडई, मनोरंजनाचे कार्यक्रम, नैमीत्तीक फेरीवाले यांच्यावर अतिरिक्त कर लावण्याची भूमिका घेतली आहे.

***शेती विकासासाठी केलेले कार्य :–***

शेती विकास साधण्याकरीता विविध साधनांचा वापर करण्यात येते. यापैकी कोणत्या निवडक साधनांचा वापर करून महिला सरपंचांनी शेती विकास साधला आहे हे जाणुन घेण्यासाठी शेती विकासासाठी काय केले ?हा प्रश्न विचारण्यांत आला. यातील प्राप्त माहिती सारणी क. 3 मध्ये दर्शविण्यांत आली आहे.

***सारणी क. 3***
***शेती विकासासाठी केलेले कार्य***

| अ.क. | शेती विकासासाठी कार्य | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | बियाणे पुरवठा | 87 | 38.16 |
| 2 | शेती सुधार तंत्रज्ञान | 23 | 10.08 |
| 3 | गांडूळखत उत्पादन | 99 | 43.42 |
| 4 | सेंद्रीय शेतीसाठी प्रोत्साहन | 19 | 08.34 |
| | एकूण | 228 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी 228 महिला सरपंचांनी ग्रामस्थांच्या शेती विकासासाठी प्रयत्न केला आहे. यापैकी शेती विकासासाठी ग्रामस्थांना बियाणे पुरवठा करणा–या 87 ( 38. 16%), शेती सुधार तंत्रज्ञान पुरवठा करणा–या 23 ( 10.08%), गांडुळ खत उत्पादन करून त्यांचा पुरवठा करणा–या 99 ( 43.42%), तर सेंद्रीय शेतीसाठी ग्रामस्थांना प्रोत्साहन देणा–या 19 ( 8.34%) महिला सरपंच आहेत.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, ग्रामस्थांचा आर्थिक विकास साधण्यासाठी गावातील शेतीचा विकास करणा–या महिला सरपंचापैकी सर्वाधिक 43.42% महिला सरपंचांनी गांडुळखत उत्पादन करून त्यांचा पुरवठा ग्रामस्थांना केला आहे. गांडूळ खताच्या माध्यमातून यांनी शेतीचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. खेडयात सुधारीत बियाणे मिळत नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीद्वारे ग्रामस्थांना बियाणे पुरवठा करण्याची भूमिका 38.16% महिला सरपंचांनी घेतली आहे.10.08% महिला सरपंचांनी शेती सुधार तंत्रज्ञानाचा वापर करून शेती सुधार केला आहे. सेंद्रीय शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य 8. 34% महिला सरपंचांनी केले आहे. यावरून शेतीची उत्पादक क्षमता टिकवून ठेवणा–या गांडुळखत (नैसर्गिक खत) व सुधारीत बियाणे पुरवठयातून उत्पादकता वाढविण्यावर महिला सरपंचांनी भर दिला आहे.

***2.महिला सरपंचांची समाज कल्याणकारी भूमिका :–***
***मागासवर्गीयांचा विकास :–***

ग्रामक्षेत्रात विविध जाती, धर्माचे लोक वास्तव्य करतात. शासनाने मागासवर्गीयांचा दर्जा निर्धारित केलेल्या लोकांचे वास्तव्य ग्राम क्षेत्रात दिसुन येते. यांच्याकडे उत्पन्नांची साधने सिमित असल्यामुळे यांची सामाजीक व आर्थिक स्थिती समृध्द नसल्याचे दिसुन येते. गावाचा विकास साधण्यासाठी गावात असलेल्या या साधन विरहीत मागासवर्गीयांचा विकास करणे अगत्याचे आहे. त्यांच्या कल्याणाशिवाय गावाचा विकास शक्य नाही. यांच्या विकासासाठी शासनाद्वाने विविध योजना राबविल्या जातात. त्या मागसवर्गिय लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम ग्रामपंचायत सरपंचास करावे लागते. 3 शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून मागासवर्गीय लोकांचा विकास महिला सरपंचाने केला काय ?हे सारणी क. 4 मधुन जाणुन घेण्यांत आले आहे.

***सारणी क. 4***
***मागासवर्गीयांचा विकास***

| अ.क. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 232 | 82.86 |
| 2 | नाही | 48 | 17.14 |
| | एकूण | 280 | 100.00 |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी मागासवर्गीयांचा विकास करणा–या 232 ( 82.86%) महिला सरपंच आहेत. तर मागासवर्गीयांचा विकास न करणा–या 48 ( 17.14%) महिला सरपंच आहेत.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 82. 86% महिला सरपंचांनी गावातील मागासवर्गीयांचा विकास केला आहे. 17.14% महिला सरपंचांनी मागासवर्गियांच्या विकासासाठी कोणतेही कार्य केले नाही. यावरून गावाचा विकास साधण्याच्या प्रक्रियेत ग्रामस्थांचा विकास साधतांना गावातील मागासवर्गीयांच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घेऊन त्यांचा विकास महिला सरपंचांनी केला असल्याचे दिसुन येते.

***अनुसूचित जाती, जमाती व भटक्या जमातीसाठी कार्य :–***

अनुसूचित जाती, जमाती व भटक्या जमातींचा विकास साधण्यासाठी त्यांना विशेष लाभ देणा–या विविध योजना शासनाद्वारे राबविण्यांत येतात. त्यांचा लाभ ग्रामस्थांना देण्यांत सरपंचांची भूमिका महत्वपूर्ण आहे. शासनाच्या या जाती, जमातीसाठी असणा–या योजनांचा लाभ त्यांना देण्यात आला काय ?हे जाणुन घेण्यासाठी त्यांना अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमातीसाठी काय केले ?असा प्रश्न विचारण्यात आला, त्यातील प्राप्त माहिती सारणी क. 5 मध्ये दर्शविण्यांत आली आहे.

**सारणी क्र. 5**
**अनुसूचित जाती, जमाती व भटक्या जमातीसाठी कार्य**

| अ.क्र. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | दलित वस्ती सुधार | 84 | 30.00 |
| 2 | तांडा वस्ती सुधार | 24 | 08.57 |
| 3 | राजश्री शाहु घरकुल योजना | 172 | 61.43 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचांपैकी अनुसूचित जाती, जमाती व भटक्या जमातीसाठी दलित वस्ती सुधार योजना 84 ( 30%) महिला सरपंचांनी राबविली. तांडावस्ती सुधार योजना राबविणा–या 24 ( 8.57%), तर राजश्री शाहु घरकुल योजना राबविणा–या 172 ( 61.43%) महिला सरपंच आहेत.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, अनुसूचित जाती, जमाती व भटक्या जमातीच्या सामाजीक उत्थानासाठी राबविल्या जाणा–या योजनामधील राजश्री शाहू घरकुल योजना सर्वाधिक 61.43% महिला सरपंचांनी राबविली आहे. यावरून लोकांना घरकुल उपलबण करून देण्याचा सर्वाधिक महिला सरपंचाचा दृष्टिकोन दिसुन येतो. दलित वस्ती सुधार योजनेंअंतर्गत कार्य करण्याचा 30% महिला सरपंचांनी प्रयत्न केला आहे. या जिल्ह्यातील ग्रामीण भागात आजही भटकी जमात तांडयात वास्तव्य करीत आहे. त्यांच्या विकासासाठी तांडा वस्तीसुधार योजना शासनाद्वारे राबविली जाते. ही योजना 8.57ः महिला सरपंचांनी राबविली आहे. यावरून असे लक्षात येते की, दलित वस्तीसुधार करणा–या सरपंचाप्रमाणेच तांडयात सुधारणा करण्याचा अल्पसा प्रयत्न महिला सरपंचाने केले आहे.

***आरोग्य विघातक (झोपडपट्टी) सुधारणा :–***

ग्रामक्षेत्रात दिवसेंदिवस वाढणा–या लोकसंख्येमुळे लोकांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण होतो. भरगच्च वस्तीच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था होत नाही. त्यामुळे गावाच्या लगतच नविन, कच्च्या घरांची व जीवनावश्यक कोणत्याही सोयी नसलेली वस्ती निर्माण होते. हा गावाचाच एक नवनिर्मित भाग असतो. यात आरोग्य पुरक कोणत्याच सोयी नसल्यामुळे या भागास आरोग्य विघातक वस्ती किंवा झोपडपट्टी असे संबोधले जाते. या ग्रामक्षेत्रात राहणा–या लोकांना जीवनावश्यक सोयीसुविधा पुरविण्याचे कार्य ग्रामपंचायतीस करावे लागते. 4 यात राहणा–या लोकांचे कल्याण साधन्याकरीता सरपंचास विकासात्मक भूमिका घ्यावी लागते. किती महिला सरपंचांनी आरोग्य विघातक वस्ती किंवा झोपडपट्टी सुधारण्यासाठी प्रयत्न केला आहे हे सारणी क्र. 6 मधुन जाणुन घेण्यांत आले आहे.

**सारणी क्र. 6**
**आरोग्य विघातक (झोपडपट्टी) सुधारणा दर्शक सारणी**

| अ.क्र. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 209 | 74.64 |
| 2 | नाही | 37 | 13.21 |
| 3 | सांगता येत नाही | 34 | 12.14 |
| | एकूण | 280 | 100.00 |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी 209(74.64%) महिला सरपंचांनी झोपडपट्टी सुधारण्याची भूमिका घेतली आहे. 37 ( 13.21%) महिला सरपंचांनी झोपडपट्टी सुधारणासाठी प्रयत्न केले नाही. 34 ( 12.14%) महिला सरपंचांना झोपडपट्टी सुधारणे संबंधि सांगता आले नाही. वरील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, झोपडपट्टी सुधारणा करणा–या महिला सरपंच सर्वाधिक 74.64% आहेत. 13.21% महिला सरपंचांनी आरोग्य विघातक वस्तीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला नाही. 12.14% महिला सरपंचांना झोपडपट्टी सुधारणे संबंधी सांगता आले नाही.यावरून गावालगत असणा–या झोपडपट्टी मध्ये सुधारणा करून त्यातील लोकांना जीवनावश्यक सुविधा देण्याची भूमिका महिला सरपंचांची दिसुन येते.

***आरोग्य विघातक वस्ती (झोपडपट्टी) सुधारणेसाठी कार्य :–***

आरोग्य विघातक वस्ती (झोपडपट्टी) सुधारणा करण्याकरीता महिला सरपंचांने कोणती भूमिका घेतली हे जाणुन घेण्यासाठी महिला सरपंचांना त्यांनी कोणत्या सुधारणा करण्याचा प्रयत्न केला ?हा प्रश्न विचारण्यांत आला. या प्रश्नाच्या उत्तराकरीता खालील पाच पर्याय देण्यांत आले.

1.घरकुल बांधणे 2.शौचखड्डे किंवा साधासंडास बांधणे.
3.रस्ते व नाल्यांची दुरूस्ती 4.शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय
5.दिवाबत्तीची सोय

उत्तरदात्या महिला सरपंचांनी एका पेक्षा अधिक कार्य केली असे उत्तर दिले. त्यामुळे त्यांचे सुलभ सारणीकरण करण्याकरिता त्यांची तीन गटात विभागणी करण्यांत आली. ही माहिती सारणी क्र. 7 मध्ये दर्शविण्यांत आली आहे.

**सारणी क्र. 7**
**आरोग्य विघातक वस्ती (झोपडपट्टी) सुधारणेसाठीचे कार्य**

| अ.क्र. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पर्याय 1 व 2 | 104 | 49.76 |
| 2 | पर्याय 3 व 4 | 54 | 25.84 |
| 3 | पर्याय 5 | 51 | 24.40 |
| | एकूण | 209 | 100.00 |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैक 209 महिला

सरपंचांनी झोपडपट्टी सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केला आहे. याकरीता 104(49.76%) महिला सरपंचांनी घरकुल बांधणे, शौचखड्डे किंवा साधा संडास बांधण्याची भूमिका घेतली आहे. 54 (25.84%) महिला सरपंचांनी रस्ते व नाल्यांची दुरूस्ती आणि शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. 51 (24.40%) महिला सरपंचांनी दिवाबत्तीची सोय केली आहे.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 49. 76% महिला सरपंच यांनी झोपडपट्टी सुधारण्याकरीता घरकुल बांधणे व शौच खड्डे किंवा साधा संडास बांधण्याचे कार्य केले आहे. रस्ते व नाल्यांची दुरूस्ती व शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय 25.84% महिला सरपंचांनी केली आहे. दिवाबत्तीची सोय 24.40% महिला सरपंचांनी केली आहे. यावरून महिला सरपंचांनी आरोग्य विघातक वस्तीमध्ये विविध सोयी करून झोपडपट्टी सुधारण्याची भूमिका घेतली आहे. याकरिता प्रामुख्याने घरकुल व शौच खड्डे किंवा साधा संडास बांधण्याचे कार्य केले आहे.

***3.महिला सरपंचांची राजकिय भूमिका :–***
***राजकीय गटबाजीचे निर्मूलन :–***

गावात विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असतात.ते राजकीय पक्षाच्या विचारधारेनुरूप वर्तन करून पक्षीय राजकारण करतात.त्यामुळे गावात राजकीय गटबाजी निर्माण होते. ही राजकीय गटबाजी विकासास मारक ठरते. या राजकिय गटबाजीतून गावाच्या विकासास विरोध केला जातो. या करीता गावातील गटबाजी संपुष्टात आणने गरजेचे असते हे लक्षात घेऊन महिला सरपंचांनी गावातील राजकीय गटबाजी निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न सारणी क्र. 8 मध्ये दर्शविण्यांत आले आहे.

**सारणी क्र. 8**
**राजकीय गटबाजीचे निर्मूलन**

| अ.क्र. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 169 | 60.36 |
| 2 | नाही | 103 | 36.78 |
| 3 | सांगता येत नाही | 08 | 02.86 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी गावात राजकीय गटबाजीचे निर्मूलन करणा–या 169 (60.36%)

महिला सरपंच आहेत. तर 103 (36.78%) महिला सरपंचांनी गावातील राजकीय गटबाजीचे निर्मूलन केले नाही. 8 (2.86%) महिला सरपंचांनी सांगता येत नाही असे उत्तर दिले आहे.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 60. 36% महिला सरपंचांनी गावातील राजकीय गटबाजीचे निर्मूलन केले आहे. तर 36.78% महिला सरपंचांनी राजकीय गटबाजी समाप्त करण्यासाठी प्रयत्न केला नाही. यावरून असे दिसुन येते की, गावात राजकीय गटबाजी नष्ट करून राजकीय एकता निर्माण करण्याची भूमिका सर्वाधिक महिला सरपंचांनी घेतली आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टीने चांगल्या बाबी असल्या तरीही राजकीय गटबाजीतून विरोध होतो याची जाणीव असल्यामुळे महिला सरपंचांनी ही भूमिका घेतली आहे. यातुन गावात राजकीय वैमनस्याचे वातावरण समाप्त झाले आहे.

### *मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थीची निवड :–*

विविध योजनांचा लाभ घेणा–या लाभार्थीची निवड ग्रामपंचायतीद्वारे केली जाते. विशिष्ट योजनांचा लाभ कोणत्या लाभर्थिंना आहे याचे दिशानिर्देश शासनाद्वारे केले जाते. त्या दिशा निर्देशानुसारच योग्य लाभार्थिची निवड करणे गरजेचे असते. परंतु गावातील राजकारणाचा प्रभाव या निवडीवर होतो. सरपंचावर दबाव आणुन हितसंबंधी व्यक्तिंना लाभ देण्याचा प्रयत्न गावात केला जातो. महिला सरपंचांनी कोणत्याही हितसंबंधाला किंवा दबावाला बळी न पडता तटस्थ राहुन मार्गदर्शन तत्वानुसार लाभार्थिची निवड करणे अपेक्षित असते, महिला सरपंचांनी मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थिची निवड केली काय ?हे सारणी क. 9 मधुन जाणुन घेण्यात आले आहे.

**सारणी क. 9**
**मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थीची निवड**

| अ.क. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय, नेहमीच | 189 | 67.51 |
| 2 | नाही, कधी कधी | 75 | 26.78 |
| 3 | कधीच नाही | 00 | 00 |
| 4 | माहित नाही | 16 | 5.71 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी लाभर्थिची निवड नेहमीच मार्गदर्शक तत्वानुसार करणा–यांची संख्या 189 (67.51%) कधी–कधी मार्गदर्शक तत्वानुसार करणा–यांची संख्या 75 (26. 78%) आहे. माहीत नाही असे उत्तर देणा–या महिला सरपंचांची संख्या 16 (5. 71%) आहे.

प्रस्तुत आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 67.51% महिला सरपंच लाभार्थिची निवड नेहमीच मार्गदर्शक तत्वाचा वापर करून करतात. 26.78% महिला सरपंचांनी लाभार्थिची निवड करताना क्वचीत प्रसंगी मार्गदर्शक तत्वाचा वापर केला आहे. तर 5.71% महिला सरपंचांनी लाभार्थिची निवड मार्गदर्शक तत्वानुसार करावी लागते हे माहित नाही. यावरून असे दिसुन येते की, महिला सरपंच लाभार्थिची निवड कोणत्याही दडपनाखाली न करता योजनेच्या नियम व मार्गदर्शक तत्वानुसार करतात.

### *संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेद्वारे वर्षभरात ग्रामस्थांना दिलेले काम :–*

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्ग गावातील लोकांना वर्षभरात काही दिवस रोजगार उपलब्ध करून दिला जातो. या माध्यमातून ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होतो. महिला सरपंचांनी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेद्वारे ग्रामस्थांना किती दिवस रोजगार दिला हे सारणी क. 10 मध्ये जाणुन घेण्यांत आले आहे.

**सारणी क. 10**
**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेद्वारे वर्षभरात दिलेले काम**

| अ.क. | संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेद्वारे वर्षभरात कार्य | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1 ते 25 दिवस | 51 | 18.21 |
| 2 | 25 ते 50 दिवस | 135 | 48.21 |
| 3 | 50 ते 100 दिवस | 37 | 13.21 |
| 4 | कार्य केले नाही | 57 | 20.36 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी ग्रामस्थांना वर्षभरात 1 ते 25 दिवस काम देणा–या महिला सरपंचांची संख्या 51 (18.21%), 25 ते 50 दिवस काम देणा–यांची संख्या 135 (48.21%), 50 ते 100 दिवस काम देणा–यांची संख्या 37 (13.21%) आहे. या योजने अंतर्गत काम न देणा–या 57 (20.36%) महिला सरपंच आहेत.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 48. 21% महिला सरपंचांनी 25 ते 50 दिवस काम या योजनें अंतर्गत दिले आहे. यानंतर 18.21% महिला सरपंचांनी 1 ते 25 दिवस काम दिले आहे. 13.21% महिला सरपंचांनी 50 ते 100 दिवस काम दिले आहे. यावरून ग्रामस्थांना 50 दिवस काम देणा–या महिला सरपंचांची संख्या अधिक आहे. 1 ते 100 दिवसापर्यंत महिला सरपंचांनी ग्रामस्थांना काम दिले आहे. यावरून महिला सरपंचांनी ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध करून दिलेले दिसून येते. या योजने अंतर्गत ग्रामस्थांना रोजगार देणे गरजेचे असले तरीही 20.36% महिला सरपंचांनी ग्रामस्थांना कोणतेही काम दिले नाही. त्यामुळे याबद्दल काही महिला सरपंच उदासिन असल्याचे सुध्दा दिसुन येते.

### *ग्रामपंचायतीच्या अन्य सदस्यांना नेतृत्वगुण वृध्दीसाठी सहकार्य :–*

गावात सरपंच हा प्रथम नागरिक आहे. गावाचे तो राजकीय नेतृत्व करतो. ग्रामपंचायत सरपंचासोबत अन्य सदस्य ही सहकारी म्हणुन कार्य करतात. या आपल्या सहकार्यामध्ये नेतृत्वगुण वृध्दीसाठी सहकार्य व मार्गदर्शन केल्यास गावात नवनेतृत्वाची निर्मिती होईल. यामुळे राजकिय नेतृत्वाची उणीव गावात भासणार नाही. याकरीता महिला सरपंचाने अन्य सदस्यांमध्ये नेतृत्व गुण वृध्दीसाठी सहकार्य केले काय ?हे सारणी क. 11 मध्ये जाणुन घेण्यांत आले आहे.

**सारणी क. 11**
**नेतृत्वगुण वृध्दीसाठी सहकार्य**

| अ.क. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 178 | 63.57 |
| 2 | नाही | 91 | 32.5 |
| 3 | सांगता येत नाही | 11 | 03.93 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी ग्रामपंचायतीच्या अन्य सदस्यांमध्ये नेतृत्वगुण वृध्दीसाठी सहकार्य करणा–या महिला सरपंचांची संख्या 178 (63.57%) आहे. या करीता अन्य सदस्यांना सहकार्य न करणा–या महिला सरपंचाची संख्या 91 (32.5%) आहे. 11 (3.93%) महिला सरपंचांनी याबद्दल सांगता येत नाही असे उत्तर दिले आहे.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 63. 57% महिला सरपंच ग्रामपंचायतीतील अन्य सदस्यांमध्ये नेतृत्व गुणांच्या वृध्दी करीता त्यांना संधी देवून सहकार्य व मार्गदर्शन करतात. 32.5% महिला सरपंचांनी याकरीता सहकार्याची भूमिका घेतलेली दिसुन येत नाही. तर 3.93% महिला सरपंच याबद्दल सांगता आले नाही. यावरून राजकारणात दुस–या बद्दल तिरस्कार व द्वेश भावना न ठेवता इतरांच्या राजकिय विकासाचा त्यांच्यात नेतृत्वगुण वृध्दीचा प्रयत्न महिला सरपंचांनी केलेला दिसुन येतो.

### *महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न :–*

सर्वच महिला सरपंचांनी महिला ग्रामसभा घेतली असली तरीही त्यात महिलांची उपस्थिती फारच कमी राहते. गावातील सर्वच महिला या सभेस

उपस्थित नसतात. त्यामुळे महिला सभेतील उपस्थिती वाढविणे अगत्याचे आहे. महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढविण्यासाठी महिला सरपंचाने काय केले हे सारणी क्र. 12 मध्ये जाणुन घेण्यांत आले आहे.

### सारणी क्र. 12
### महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न

| अ.क्र. | महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | अंगणवाडी शिक्षिका, मदतनिस, आरोग्य सेविका यांना आमंत्रण | 105 | 37.50 |
| 2 | हळदी– कुंकूवाचे आयोजन | 62 | 22.14 |
| 3 | चहा पाण्याचे आयोजन | 24 | 08.57 |
| 4 | पर्याय 1 व 2 | 45 | 16.07 |
| 5 | गैरलागु (कोणतेही प्रयत्न नाही) | 44 | 15.71 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदशनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी ग्रामसभेतील महिलांची उपस्थिती वाढविण्यासाठी गावातील अंगणवाडी शिक्षिका, मदतनिस, आरोग्य सेविका या महिला कर्मचा–यांना आमंत्रीत करणा–या 105 (37.60%) महिला सरपंच आहेत. हळदी–कुंकूवाचे कार्यक्रम आयोजित करणा–या 62 (22.14%), चहा पाण्याचे आयोजन करणा–या 24 (8. 57%) महिला सरपंच आहेत. गावातील अंगणवाडी शिक्षिका, मदतनिस, आरोग्य सेविका या महिला कर्मचा–यांना बोलावून हळदी कुंकूवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करणा–या 45 (16.07%) महिला सरपंच आहेत.ग्रामसभेतील महिलांची उपस्थिती वाढविण्यासाठी कोणताही प्रयत्न न करणा–या 44 (15.71%) महिला सरपंच आहेत.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, गावातील महिला कर्मचा–यांना ग्रामसभेला बोलविल्यास गावातील अन्य महिला ही ग्रामसभेस उपस्थित राहतात या जाणिवेने 37.50% महिला सरपंचांनी अंगणवाडी शिक्षिका, मदतनिस, आरोग्य सेविका यांना ग्रामसभेस आमंत्रीत केल्या आहेत. ग्रामसभेच्या दिवशी महिलांसाठी हळदी, कुंकूवाचे कार्यक्रम ग्रामपंचायतीत आयोजीत केल्यामुळे महिला ग्रामसभेस उपस्थित राहतात. त्या दृष्टीने 22.14% महिला सरपंचांनी हळदी कुंकूवाचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. ग्रामसभेस गावातील महिला कर्मचा–यांना बोलावून हळदी कुंकूवाचे कार्यक्रमाचे आयोजन 16.07% महिला सरपंचाने केले आहे. ग्रामसभेत महिला सरपंचांची उपस्थिती वाढावी म्हणुन यासाठी चहा पानाचे आयोजन 8.57% महिला सरपंचांने केले आहे. यावरून ; 37. 50 + 22.14 + 8.57 + 16.07 =) 84.29% महिला सरपंचांनी ग्रामसभेत महिलांची उपस्थिती वाढविण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत. तर 15.71% महिला सरपंचांनी ग्रामसभेतील उपस्थिती वाढविण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही.

#### *महिला बचत गट निर्मिती :–*

महिलांना आर्थिक समृध्दि प्राप्त करण्यासाठी व याद्वारे त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी महिला बचत गटांची स्थापना प्रत्येक गावात होत असल्याचे दिसुन येते. महिला बचत गटाच्या माध्यमातुन महीलांचा आर्थिक विकास होतो. यातून महिलांमध्ये नेतृत्व क्षमता वृध्दिंगत सुध्दा होत असते. यादृश्टीने महिला बचत गट गावात महत्वपूर्ण आहेत. महिला सरपंचांनी गावात महिला बचत गटांची निर्मिती केली आहे काय ?हे सारणी क्र. 13 मधुन जाणुन घेण्यांत आले आहे.

### सारणी क्र. 13
### नेतृत्वगुण वृध्दीसाठी सहकार्य

| अ.क्र. | महिला सरपंचाचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 194 | 69.28 |
| 2 | नाही | 77 | 27.5 |
| 3 | सांगता येत नाही | 09 | 03.22 |
| | एकूण | 280 | 100.00 |

प्रस्तुत सारणीवरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या 280 महिला सरपंचापैकी महिला बचत गटाची निर्मिती करणा–यांची संख्या 194 (69.28%) तर त्यांची निर्मिती न करणा–यांची संख्या 77 (27.50%) आहे. 9 (3.22%) महिला सरपंचांना या बद्दल सांगता आले नाही.

उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 69. 28% महिला सरपंचांनी महिला बचत गटाची निर्मिती केली आहे. तर 27.50% महिला सरपंचांनी महिला बचत गटाची निर्मिती केलेली नाही. 3.22% महिला सरपंचाना याबद्दल सांगता आले नाही. यावरून महिला बचत गटाची निर्मिती करून महिला आर्थिक समृध्दी देण्याची भूमिका महिला सरपंचांनी घेतल्याचे दिसुन येते.

#### *निष्कर्ष :–*

या संशोधन विषयाच्या अनुशंगाने संशोधनाद्वारे प्राप्त झालेली काही प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

1.महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी केली आहे. 70.72 टक्के महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी केली आहे. यासाठी 57.07 टक्के महिलांनी स्थानिक करात वृध्दी करण्याची, 38.89 टक्के महिला सरपंचांनी अनावश्यक खर्चास प्रतिबंध करण्याची भूमिका घेतली आहे.

2.ग्रामीण विकास साधण्यासाठी शेती विकास करणे गरजेचे आहे. हे ओळखुन महिला सरपंचांनी शेती विकासाचा प्रयत्न केला आहे. या करीता 38.16 टक्के सरपंचांनी नविन बियाणे पुरवठा तर 43.42 टक्के महिला सरपंचांनी गांडुळखत उत्पादन करून त्यांचा शेती विकासासाठी उपयोग करण्याची भूमिका घेतली आहे.

3.गावातील मागासवर्गीयांचा विकास करण्याची भूमिका 82.86 टक्के महिला सरपंचांनी घेतली आहे. याकरीता दलित वस्ती सुधार, राजश्री शाहु घरकुल योजना मोठया प्रमाणात महिला सरपंचांनी राबविली आहे.

4.झोपडपट्टी सुधारणा करण्यासाठी 74.64 टक्के महिला सरपंचांनी प्रयत्न केला आहे. याकरीता घरकुल बांधणे, नाल्यांची दुरूस्ती साधा संडास बांधणे व शुध्द पाण्याची व्यवस्था करण्याची भूमिका महिला सरपंचांनी घेतली आहे.

5.गवातील गटबाजीचे निर्मूलन करण्यासाठी महिला सरपंचांनी प्रयत्न केले आहे.

6.वाशिम जिल्ह्यात मागासवर्गीयांची (अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती, इतर मागास वर्ग) संख्या अधिक आहे. ग्राम क्षेत्रातील मागासवर्गीयांच्या विकासासाठी महिला सरपंचांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. 82.76 टक्के महिला सरपंचांनी मागासवर्गीय विकासासाठी प्रयत्न केले आहे. परंतु 17.24 टक्के महिला सरपंचांनी नकारात्मक भूमिका घेतली आहे. या विकास कार्यास प्राथमिकता देणा–या महिला सरपंच कमी असून यास दुय्यम स्थान देणा–या महिला सरपंच अधिक आहेत. यावरून असे निदर्शनास येते की, महिला सरपंचांनी मागासवर्गीयांचा विकास केला आहे. परंतु यास प्राथमिकता न देता दुय्यम स्थान किंवा तृतीय स्थान देण्याची भूमिका त्यांची आहे. मागासवर्गीय विकासाकरिता त्यांनी घरकुल बांधून दिले आहे.

7.गावातील ग्रामस्थांना 25 ते 50 दिवस संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेद्वारे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याची भूमिका सर्वाधिक महिला सरपंचांनी घेतली आहे.

8.गावात राजकीय नेतृत्व वृध्दिंगत व्हावे म्हणुन महिला सरपंचांनी प्रयत्न केले आहे. यासाठी महिलांची ग्रामसभेत उपस्थिती वाढविण्यासाठी महिला सरपंचांनी गावातील महिला शासकीय कर्मचारी यांचा सहभाग करून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

9.गावात महिलांचा विकास होण्याच्या दृष्टीने महिला सरपंच महिला बचत गटाची निर्मिती करतात.

10.ग्रामक्षेत्र विकासाकरिता ग्रामपंचायतीची आर्थिक समृध्दी, उत्पन्नात वृध्दी ही प्राथमिक निकड आहे. 70.72 टक्के महिला सरपंचांनी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वृध्दी केली आहे. याकरिता त्यांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या उत्पन्न वाढीशिवाय ग्रामस्थांच्या आर्थिक संपन्नतेसाठी ग्रामउद्योग व शेती सुधार महिला सरपंचांनी केला आहे. यावरून ग्रामपंचायत व ग्रामस्थांमध्ये आर्थिक समृध्दी आणण्याची भूमिका महिला सरपंचांनी घेतली आहे.

11.महिला सरपंच लाभार्थ्याची यादी बनवितात. लाभार्थ्याची यादी शासकीय कार्यक्रम किंवा योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बनविली जाते. 67.5 टक्के महिला सरपंच या नेहमीच मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थ्याची यादी बनवितात तर 26.78 टक्के महिला सरपंच लाभार्थ्यांची यादी बनवितांना कधी–कधी मार्गदर्शक तत्वाचा वापर करतात. यावरून योजनेच्या मार्गदर्शक तत्वाचा वापर करून लाभार्थीची यादी महिला सरपंच बनवितात.

यावरून ग्रामविकास साधण्यासाठी महिला सरपंचांनी राजकीय, आर्थिक व सामाजिक विकासाच्या विविध भूमिका घेतल्याचे दिसुन येते.

*संदर्भ टिपा*

1.नांदेडकर, व्ही. जी. पंचायतराज एक विश्लेषणात्मक परामर्श, के. सागर प्रकाशन, पुणे 2008,पृ.10.
2.साबळे उध्दव, ग्रामसेवक आणि तयांची ग्रामपंचायत, खुजे ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, चंद्रपूर, 2007, पृ. 35.
3.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958, अनुच्छेद 49.
4.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958, अनुच्छेद 7.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net